# स्वेच्छा सेवा निवृत्ती

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 नुसार वर्ग 3 चे कर्मचा-यास 58 वर्षे व वर्ग 4 चे कर्मचा-यांस 60 वर्षे पर्यंत सेवेत ठेवता येते .

वर्ग 3 व 4 मधील सेवकांना वयाचे 50 ते 55 वर्षानंतर प्रकरण पुनर्विलोकन करुन सेवेत मुदतवाढ देण्याचा अथवा मुदतपुर्वी सेवा निवृत्त करण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिका-यास आहे. (नियम 10 )(ए) (दोन)

नियम 65 वव 66 नुसार 20 व 30 वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर कर्मचा-यास नियुक्ती प्राधिका-यास तीन महिन्याची लेखी नोटीस देऊन पुर्ण सेवा निवृत्त होता येईल. (स्वेच्छा सेवा निवृत्त) स्वेच्छा सेवा निवृत्ती बाबत दिलेली नोटीस नियुक्ती प्राधिका-याची स्पष्ट मान्यता असल्याशिवाय मागे घेता येणार नाही. तसेच नियुक्ती प्राधिका-यांनी तीन महिन्याचे नोटीसीनुसार स्वेच्छा सेवानिवृत्तीस नकार दिला नाही तर कालावधी समाप्तीच्या तारखेस सेवा निवृत्ती अंमलात येईल.

ज्या सेवकाची 20 वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाली आहे अशा सेवकास नियम 66 नुसार तीन महिन्याची नोटीस देऊन स्वेच्छा सेवा निवृत्त होता येईल.

स्वेच्छेने सेवा निवृत्त होण्याबद्दल दिलेली नोटीस नियुक्ती प्राधिका-याने स्विकारणे आवश्यक आहे. (नियम 66 (2) जर कालावधी संपण्यापुर्वी नियुक्ती प्राधिका-याने सेवा निवृत्तीसाठी परवानगी देण्यास नकार दिला नाही तर सेवा निवृत्ती कालावधी समाप्तीच्या तारखेपासुन अंमलात येईल.

स्वेच्छा सेवा निवृत्त होणा-या सेवकास अर्हताकारी सेवेचा कालावधी जास्तीत जास्त पाच वर्षा पर्यंत व एकुण अर्हताकारी सेवा 30 वर्षापेक्षा जास्त होणार नाही. या मर्यादेत वाढविण्यात येईल. नियम 66 (3) व यिम 6 (4) नुसार 3 महिन्याचे कमी कालावधीची नोटीस कारणे देऊन स्विकारणे बाबत कर्मचा-यास विनंती करता येईल.

ज्या कर्मचा-याने तीन महिन्याची नोटीस देवुन स्वेच्छा सेवा निवृत्ती मागणी केली आहे त्यास नियुक्ती प्राधिका-याची स्पष्ट मान्यता असल्या खेरीज नोटीस मागे घेण्यास प्रतिबंध आहे. (नियम 66 (5)

अर्हताकारी सेवेमध्ये जास्तीत जास्त पाच वर्षाची वाढ झाल्यामुळे निवृत्ती वेतन व उपदान काढण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही मानीव वेतन निश्चितीस हक्क असणार नाही (नियम 66(6)

स्वेच्छा सेवा निवृत्तीचे प्रस्ताव सादर करतांना विभाग प्रमुखांनी त्यांचे विरुध्द चौकशी व वसुली नसले बाबत खात्री व प्रमाणित करावे. प्रस्ताव प्राप्त होताच त्यांचे वेतन पडताळणी अर्थ विभागांकडून तात्काळ करुन घेण्यात यावी. तसेच इतर सेवा विषयक बाबींची पुर्ततेची खात्री करुन परिपुर्ण प्रस्ताव प्रदान अधिकारानुसार सक्षम प्राधिकारी यांचे मंजुरीस्तव सादर करावा.